THE KALYAN JANATA SAHAKARI BANK LTD.
दि कल्याण जनता सहकारी बँक लि.
MULTI STATE SCHEDULED BANK

**दि.30.06.2017**

**: सभासदांसाठी सूचना :**

प्रतिवर्षी प्रमाणे इ. 10 वी व इ. 12 वी परीक्षेत विशेष प्राविण्य मिळविणाऱ्या तसेच इ. 5 वी शिष्यवृत्ती, इ. 8 वी शिष्यवृत्ती व इ. 10 वी नंतर होणारी राष्ट्रीय प्रज्ञा शोध परीक्षा /ऑलिम्पियाड शिष्यवृत्ती मिळविणाऱ्या सभासदांच्या पाल्यांसाठी/सभासदांसाठी "प्राविण्य पुरस्कार" देण्यात येणार ओत. त्यासाठी करावयाचे छापील अर्ज शाखांमध्ये व बँकेच्या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आले आहेत. कृपया सभासदांनी खालील मार्गदर्शक सूचीनुसार अर्ज भरुन त्यासोबत योग्य त्या कागदपत्रांच्या प्रमाणित प्रती जोडून आपला अर्ज शाखेमध्येच **दि. 20 जुलै 2017** पर्यंत जमा करावा.

**(31 मार्च 2017 अखेर असलेल्या बँकेच्या सर्व सभासदांना / सभासदांच्या पाल्यांना या योजनेचा लाभ घेता येईल.)**

1. **विद्यार्थी प्राविण्य पुरस्कारासाठीचा अर्ज, सभासदाने करावयाचा असून अर्जावर सभासदाची स्वाक्षरी आवश्यक आहे.**
2. **अर्जावर सभासदाचे नाव, सभासद क्रमांक, फोन नंबर, मोबाईल नंबर, ई मेल आय डी इत्यादी व्यवस्थित लिहिलेले असणे आवश्यक आहे.**
3. **अर्जासोबत सभासदाने ओळखपत्र / भागप्रमाणपत्राची छायांकित प्रत लावणे आवश्यक आहे.**
4. **अर्जसोबत परीक्षा उत्तीर्ण झाल्याबाबत गुणपत्रिकेची स्वप्रमाणित प्रत (self-attested copy) जोडावी.**
5. **मागासवर्गीय गटासाठी अर्ज करणाऱ्या सभासदांनी जातीच्या दाखल्याची स्वप्रमाणित प्रत अर्जासोबत लावणे आवश्यक आहे.**
6. **प्राविण्य पुरस्काराचे पात्रता निकष अर्जाच्या मागील बाजुस छापलेले आहेत. निकषात बसत नसलेले अर्ज स्विकारले जाणार नाहीत, याची कृपया नोंद घ्यावी.**
   **(निकषात बसत नसलेल्या अर्जाबाबत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही.)**
7. **अर्ज स्विकारण्याची अंतिम तारीख 20 जुलै 2017 राहील.**
8. **सदर प्राविण्य पुरस्कार अर्ज बँकेच्या वेबसाईटवर (Member's corner) येथे उपलब्ध आहेत.**
9. **विद्यार्थी प्राविण्य पुरस्कार वितरण समारंभ रविवार दिनांक 30 जुलै 2017 रोजी सकाळी 10.30 वाजता नूतन विद्यालय कर्णिक रोड, कल्याण (प) येथे आयोजित करण्यात आला आहे. पात्र सभासद पाल्य / सभासद यांनी कार्यक्रमाच्या नियोजित ठिकाणी वेळेपूर्वी किमान अर्धा तास आधी उपस्थित राहावे.**
10. **कार्यक्रमाबाबत काही अपरिहार्य बदल अथवा तातडीची सूचना असल्यास, सभासदांच्या माहितीसाठी सर्व शाखांमध्ये तशी सूचना लावण्यात येईल.**

**टीप: शैक्षणिक वर्ष 2016-2017 या कालावधीतच परीक्षा दिलेली असणे आवश्यक आहे.**

**जनसंपर्क विभाग**